RNI No. MAHBIL/2009/35529

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ३६] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ९-१५, २०२१/भाद्र १८-२४, शके १९४३ [पृष्ठे २४ किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### अधिसूचना

### जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून

क्रमांक नपाप्र/कार्या-१/रोहा/पार्कींग/उपविधी/२०२१.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३२२(३)(ई) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड या प्रगटनाद्वारे रोहा नगरपरिषद हद्दीत सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ नियोजन यासाठी खालीलप्रमाणे उप विधी जाहीर करणेत येत आहे.

### उप विधी

### प्रारंभिक-प्रस्तावना

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या प्रकरण ९ मधील कलम १०८ -अ (निरनिराळ्या वाहनाकरीता निरनिराळ्या दराने, सार्वजनिक रस्त्यावर व सार्वजनिक जागी वाहने उभी करण्याकरीता फी) मधील तरतुदीनुसार नगरपालिकेच्या हद्दीतील सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ नियोजन व्यवस्थापनाची जबाबदारी रोहा नगरपरिषदेची आहे. यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी नगरपरिषदेकडे आल्यामुळे या सर्व तरतुदीचे अधिक स्पष्टीकरण देणारे नियम तयार होणे नगरपालिकेच्या अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने व नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक होते. जेणेकरुन अधिकाऱ्यांना व नागरीकांना आपल्या जबाबदाऱ्यां कोणत्या आहेत हे स्पष्ट होईल. जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास काय होईल हेही समजेल. तसेच जबाबदाऱ्यांचे विकेंद्रीकरण करुन नागरीकांचा सहभागही वाढावा या सर्व हेतूने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३२२ च्या तरतुदीनुसार कलम १०९-अ (१) (२) (३) (४) अन्वये कार्यपद्धतीचे अवलंब करुन रोहा नगरपरिषद सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ नियोजन यासाठी हे उप विधी आहेत.

**(१) नामाभिधान व्याप्ती व प्रारंभ :—**

(अ) हे उप विधी रोहा नगरपरिषद (सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ नियोजन) उप विधी, २०२० या नावाने संबोधण्यात येतील.

(ब) हे उप विधी राज्य शासनाच्या मान्यतेनंतर अंतिमरित्या **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

**(२) नामाभिधान व्याप्ती व प्रारंभ :—**

**(१) संदर्भात अथवा काही प्रतिकूल नसल्यास या उप विधी.**

(क) ' अधिनियम ' म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(ख) ' नगरपरिषद ' म्हणजे वरील '१अ' मध्ये नमुद करण्यात आलेली नागरी संस्था.

(ग) ' नगराध्यक्ष ' म्हणजे अधिनियमांच्या कलम ५१ अन्वये निवडून आलेले नगरपरिषदेचे अध्यक्ष.

(घ) ‘ उपनगराध्यक्ष ’ म्हणजे अधिनियमांच्या कलम ५१-अ अन्वये नेमणूक झालेले नगरपरिषदेचे उपाध्यक्ष.

(त) ‘ बांधकाम सभापती ’ नगरपरिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती.

(थ) ‘ कर निरिक्षक ’ नगरपरिषदेने नेमणूक केलेला कर निरिक्षण अधिकारी.

(द) ‘ सार्वजनिक उपद्रव ’ म्हणजे या उप विधीच्या तरतुदीनुसार विहित केलेल्या पद्धतीचे जाणून-बुजून व अजाणता पालन न करण्याचे झालेले कोणतेही कृत्य.

(ध) ‘ प्रशासकिय आकार ’ म्हणजे या उप विधीच्या तरतुदीचे कोणत्याही व्यक्तीने पालन न केल्यामुळे त्यांच्या निवारणार्थ नगरपरिषदेला कराव्या लागणाऱ्या कामासाठी येणारा खर्च.

(न) ‘ मुख्याधिकारी ’ म्हणजे अधिनियम कलम ७५ च्या तरतुदीनुसार नगरपरिषद क्षेत्रांसाठी नेमण्यात आलेला अधिकारी किंवा नेमणूक केली असल्याचे समजण्यात आलेला इसम.

(प) ‘ अभिकरण/अभिकर्ता ’ म्हणजे वाहनतळावर वाहनतळ शुल्क/दंड वसुल करणे व अन्य अशा सुपुर्त केलेल्या कर्तव्यांचे किंवा कार्याचे निर्वाहन करण्यासाठी नगरपरिषद नियुक्त किंवा प्राधिकृत केलेली संस्था/व्यक्ती.

(प) ‘ नो-पार्किंग ’ म्हणजे कोणतेही वाहन उभे करण्यास प्रतिबंध असलेले क्षेत्र.

(फ) ‘ सम-पार्किंग ’ म्हणजे वाहन रस्त्याच्या कडेला ज्या दिशेला उभे करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील सम संख्या असलेल्या तारखा. उदा. २, ४, ६.....

(ब) ‘ विषम-पार्किंग ’ म्हणजे कोणतेही वाहन उभे करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील विषम संख्या असलेल्या तारखा. उदा. १, ३, ५......

(भ) ‘ टोईंग व्हॅन ’ म्हणजे कोणतेही वाहन नो-पार्किंग मध्ये उभे केल्यास सदर वाहनास वाहन तळाकडे वाहून नेण्यासाठी वापरले जाणारे वाहन.

(म) ‘ टोईंग व्हॅन भाडे ’ म्हणजे नो-पार्किंग मध्ये उभे केलेल्या वाहनास वाहनतळाकडे वाहून नेण्यासाठी आकारले जाणारे भाडे.

(य) ‘ वाहन पार्किंग फी ’ म्हणजे निरनिराळ्या वाहनांकरिता निरनिराळ्या दराने सार्वजनिक रस्त्यांवर व सार्वजनिक जागी वाहने उभी करण्याकरिताची फी.

(र) ‘ वाहन पार्किंग भाडे ’ म्हणजे कोणतेही वाहन वाहनतळात उभे करण्यासाठी प्रती तास आकारली जाणारी रक्कम.

(ल) ‘ वाहन प्रकार ’ म्हणजे पार्किंगच्या भाडे आकारणीसाठी त्यांच्या आकाराप्रमाणे पाडलेले वाहनाचे प्रकार. उदा.दुचाकी, तीन चाकी.....

**(२) या उप विधीत वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा या शब्द समुहांचा अर्थ खंड (१) समाविष्ट नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो असल्याचे समजण्यात येईल.**

**(३) उप विधीची अंमलबजावणी :—**

(१) नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व क्षेत्रांमध्ये शहराच्या हद्दीतील वाहनांसाठी व शहराबाहेरून येणाऱ्या सर्व वाहनांसाठी लागू असतील.

(२) नगरपरिषदेतील या उप विधींच्या तरतुदी अंमलात आणण्याचे काम ज्या नगरपरिषदेच्या प्रधिकरणाकडे सोपविण्यात आले आहे ते पुढीलप्रमाणे आहे :—

(अ) नगराध्यक्ष/उप नगराध्यक्ष/बांधकाम सभापती.

(ब) मुख्याधिकारी

(क) कर निरिक्षक

(३) वरील अधिकारी व पदाधिकारी उप विधींच्या कलम ३ (२) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीकरीता जबाबदार असतील.

(४) ही जबाबदारी पार पाडण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांनी सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ व्यवस्थापनाची नियोजनबद्ध पद्धत विहित करणे आवश्यक आहे.

**(४) सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ अंमलबजावणी पद्धत विहित करण्याचा नगरपरिषदेचा अधिकार :—**

(१) सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ अंमलबजावणीची पद्धत नगरपरिषद आवश्यकतेनुसार तसेच क्षमतेप्रमाणे एकत्रित किंवा वेगवेगळी विहित करील या पद्धतींना योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल.

(२) नगरपरिषदेने उप विधीस मान्यता दिल्यानंतर सुद्धा शिस्तबद्ध वाहने पार्क करण्याबाबतची उपयुक्तता लक्षात घेऊन विविध प्रकारच्या वाहनांचे पार्किंग बाबत आणखी वर्गीकरण करुन वाहनांच्या प्रकारानुसार वाहने पार्क करणेबाबत आदेश देण्यास नगरपरिषद सक्षम असेल.

**(५) रस्त्यावरील तसेच वाहनतळाच्या ठिकाणी वाहन पार्क केल्यानंतरची वाहन मालक व वाहन चालकाची जबाबदारी :—**

(१) सम-विषम पार्किंग, नो-पार्किंग व वाहनतळ अंमलबजावणीची पद्धत नगरपरिषद आवश्यकतेनुसार तसेच क्षमतेप्रमाणे एकत्रित किंवा वेगवेगळी विहित करील या पद्धतींना योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल.

(२) नगरपरिषदेने उप विधीस मान्यता दिल्यानंतर सुद्धा शिस्तबद्ध वाहने पार्क करण्याबाबतची उपयुक्तता लक्षात घेऊन विविध प्रकारच्या वाहनांचे पार्किंगबाबत आणखी वर्गीकरण करुन विविध ठिकाणी वाहनांच्या प्रकारानुसार वाहने पार्क करणेबाबत आदेश देण्यास नगरपरिषद सक्षम असेल.

(३) सम-विषम पार्किंगमध्ये वाहन पार्क केल्यानंतर काही कारणास्तव वाहनाची नुकसानी अथवा तुटफुट झाल्यास होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी सर्वस्वी मालक अथवा चालकाची राहिल.

(४) सम-विषम पार्किंगमध्ये केवळ दुचाकी वाहने उभी करता येतील.

(५) सम-विषम पार्किंगमध्ये उभी केलेल्या दुचाकी वाहनांवर प्रती तासाप्रमाणे फी आकारली जाईल.

(६) पार्क केलेले वाहन विहित मुदतीमध्ये आपले वाहन ताब्यात न घेतल्यास सदर वाहनाची तुटफुट अथवा नुकसानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मालक अथवा चालकाची राहिल.

(७) वाहनतळामध्ये वाहन पार्क केलेल्या वाहनास शॉर्ट सर्किटमुळे वाहनाला आग लागणे व त्यापासून दुसऱ्या वाहनाचे नुकसान झाल्यास अशा प्रकारचे नुकसानीस संबंधीत वाहन मालक अथवा चालक जबाबदार राहिल.

(८) वाहन पार्किंग फी पावती न घेता वाहनतळात वाहन पार्क केल्यानंतर उद्‌भवलेल्या परिस्थीतीबाबत तक्रार केल्यास वाहन मालक व चालकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**(६) सम-विषम पार्किंगसाठी असलेले रस्ते व ठिकाणे यांचा तपशिल :—**

| अ. क्र. (१) | रस्त्याचे नाव (२) |
|---|---|
| **अ.** | **दोन चाकी वाहनांकरीता सम तारखेस पार्कींग.** |
| १. | जैन मंदिर ते राधिका गिफ्ट पर्यंत. |
| २. | नगरपरिषद कार्यालयापासून ते कै.माणिकराव तेलंगे मार्केट ते दिव्य दर्शन कॉनर ओम चेंबर पर्यंत. |
| ३. | जयराम बार ते कुंडलिका वैभव बिल्डींगपर्यंत. |
| ४. | रोहा-नागोठणा रस्ता राजमाता जिजाऊ बचत भवन ते रुमाना नाडकर यांचे हॉटेलपर्यंत. |
| ५. | श्रीविठ्ठल मंदीर पासून श्री.महेश चाचड यांचे दुकान. |
| ६. | श्रीराम मारुती चौक ते गांगल मेडिकल स्टोअरपर्यंत. |
| ७. | अंधार आळी, रोहन अपार्टमेंट ते अमर कॉम्प्लेक्सपर्यंत. |

| अ. क्र. (१) | रस्त्याचे नाव (२) |
|---|---|

**ब. दोन चाकी वाहनांकरीता विषम तारखेस पार्कींग.**

१. डॉ. देवेंद्र जाधव नर्सिंग होम ते दमखाडी राधास्वामी हॉटेलपर्यंत.

२. दमखाडी राधास्वामी हॉटेल पासून देशमुख वाईन शॉप पर्यंत.

३. राव कॉम्पलेक्सपासून सचिदानंद कॉम्प्लेक्सपर्यंत (चनेवाला बिल्डींग).

४. नागावकर यांचे बिल्डींग पासून ते न्यु एक्सप्रेस बेकरीपर्यंत.

५. एल. जी. कॉम्प्लेक्स ते तीन बत्ती नाका.

६. रोहा-नागोठणे रस्ता एल.जी.कॉंप्लेक्स ते हॉटेल प्राईड.

७. आडवी बाजारपेठ बाबुलाज जैन ते एम.जे.सेल्सं यांचे दुकानापर्यंत.

८. श्रीविठ्ठल मंदीर गल्ली श्री.किशोर दोशी दवाखाना ते आनंदी अपार्टमेंट.

९. प. पु. श्री. पांडुरंग शास्त्री आठवले यांचे घर ते प्रभाकर पवार यांचे घर.

१०. अंधार आळी श्री.नाना साळवी यांचे घर ते श्री.प्रकाश पवार यांचे घर.

**क. तीन, चार चाकी वाहनांकरीता पार्कींग.**

१. कै.दिलीप गणेशदत्त राजे वाहनतळ.

२. भारतरत्न डॉ.ऐ.पी.जे.अब्दुल कलाम वाहनतळ.

**(७) नो-पार्किंगसाठी असलेले रस्ते व ठिकाणे यांचा तपशिल :**

| अ. क्र. (१) | रस्त्याचे नाव (२) |
|---|---|

**अ नो-पार्कींग झोन**

१. नगरपरिषद कार्यालयासमोरील चौक (सई गिफ्टस ते श्री साई कलेक्शन समोर दुचाकी पार्किंग वगळून).

२. नगरपरिषदेपासून वीर सावरकर रस्ता ते राममंदिर मारुती चौक.

३. बोराणा किराणा दुकान ते नगरपरिषद कार्यालयापर्यंत.

४. कै.रामभाऊ दिवेकर मार्ग .

५. एस.टी.स्टॅन्डचे पाठीमागील बायपास रस्ता.

६. धनगरआळी श्री. आशिष जाधव यांचे घर ते नगरपरिषद कार्यालयापर्यंत.

७. श्री. जैन यांचे कापड दुकान ते श्री सत्यनारायण मंदिर.

८. सत्या अपार्टमेंट (सागर डेअरी) ते पवार हाउसपर्यंत.

९. आडवी बाजारपेठ रजमल जैन ते बोधले यांचे घर.

१०. कै. जनार्दन शेडगे दुकान ते सत्यनारायण मंदिर घरापर्यंत.

**टिप.—** तीनबत्ती नाका ते राम मारुती मंदिर चौक या रस्त्याने एकेरी वाहतूक करुन सम-विषम तारखेस पार्किंग करण्यात यावी तसेच येताना उप जिल्हा रुग्णालय ते राम मारुती चौक ते वीर सावरकर रस्त्याने एसटी स्टॅंड, रोहा-कोलाड मुख्यमार्ग अशी वाहतुक राहिल.

**(८) रस्त्यावरील तसेच वाहनतळाच्या ठिकाणी वाहन पार्कींग फी तपशिल :—**

| अ. क्र. | जागेचे नाव/वाहन तळाचे नाव | वाहनाचा प्रकार | पार्कींग करीता नगरपरिषदेचे आकारणेत येणारे दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (अ) | कै. दिलीप गणेशदत्त राजे वाहनतळ व न.प.मालकीच्या इतर जागा. | दोन चाकी वाहने | ३ तासाकरीता र. रु. २०/- व त्यापुढे रक्कम रु. ३०/- |
| | | तीन चाकी वाहने | ३ तासाकरीता र. रु. २५/- व त्यापुढे तासाकरीता प्रती तास रक्कम रु. २०/- |
| | | चार चाकी छोटी वाहने, टेम्पो. | ३ तासाकरीता र. रु. ४०/- व त्यापुढे तासाकरीता प्रती तास रक्कम रु. २०/- |
| | | बस, ट्रक इत्यादी मोठी वाहने | २ तासाकरीता र. रु. ५०/- व त्यापुढे प्रति तासाकरिता रु. २०/- |
| (ब) | भारतरत्न डॉ.ऐ.पी.जे. अब्दुल कलाम वाहनतळ | दोन चाकी वाहने | ३ तासाकरीता र. रु. २०/- व त्यापुढे रक्कम रु. ३०/- |
| | | तीन चाकी वाहने | ३ तासाकरीता र. रु. २५/- व त्यापुढे तासाकरीता प्रती तास रक्कम रु. २०/- |
| | | चार चाकी छोटी वाहने, | ३ तासाकरीता र. रु. ४०/- व त्यापुढे तासाकरीता प्रती तास रक्कम रु. २०/- |
| (क) | सम/विषम तारखेस रस्त्याचे बाजुस उभी करणेंत येणाऱ्या दुचाकी वाहनांवर आकारावयाची आकार. | | रुपये- ०५/- प्रती तास |

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग.

## BY THE COLLECTOR OF RAIGAD

No. MUN/karya-1/Roha/Parking/Upvidhi/2021.— In Exercise of the powers vested in me under section 322(3)(e) of Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Towns Act, 1965, I Nidhi Choudhari, Collector of Raigad, hereby publish the limits of Roha Municipal Council Bylaws for even-odd parking, no-parking and parking planning, held as mentioned in below.

### Bylaws

### Introduction

Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Towns Act, 1965 Section 108-A of Chapter 9 (Fees for parking of vehicles on public roads and in public places at different rates for different vehicles) Within the limits of the municipality as per the provisions of Roha Municipal Council is responsible for even-odd parking, no-parking and parking planning management. As the responsibility for their implementation falls on the Municipal Council, it was necessary to formulate rules that would further clarify all these provisions from the point of view of the implementing officers of the municipality and the citizens. So that the officials and the citizens have their responsibilities will be clear. It will also understand what will happen if responsibilities are violated. Also for the purpose of increasing the participation of citizens by decentralizing responsibilities Roha Municipal Council by adopting the procedure as per Section 109-A (1) (2) (3) (4) of Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Town Act, 1965. These are the bylaws for even-odd parking, no-parking and parking planning.

**(1) Nomination scope and commencement** :—

(A) This bye-law will be called Roha Municipal Council (Even-odd parking, no-parking and parking planning) bye-laws, 2020.

(B) These bye-laws shall come into force from the date of final publication in the *Government Gazette* after the approval of the State Government.

**(2) Nomination scope and commencement** :—

[1] These bylaws in context or if not to the contrary.

(A) 'Act' *i.e.* Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Towns Act, 1965.

(B) 'Municipal Council' *i.e.* above '1 a' Civic organizations mentioned in.

(C) 'Mayor' *i.e.* the President of the Municipal Council elected under Section 51 of the Act.

(D) 'Deputy Mayor' *i.e.* the Vice-president of the Municipal Council appointed under Section 51-A of the Act.

(S) 'Construction Speaker' Chairman of the Construction Committee of the Municipal Council.

(Th) 'Tax inspector' Tax Inspection Officer appointed by the Municipal Council.

(D) 'Public nuisance' That is, any act committed knowingly or unknowingly following the procedure prescribed under the provisions of this bye-law.

(S) 'Administrative size' That is, the expenses incurred by the Municipal Council for the redressal of any person who has not complied with the provisions of this bye-law.

(N) ' Chief ' This means an officer appointed for the Municipal Council areas as per the provisions of Section 75 of the Act.

(P) 'Agency' That is, an organization/person appointed or authorized by the Municipal Council to collect parking fees/fines at the parking lot and to discharge other such assigned duties or functions.

(P) 'No-parking' *i.e.* an area where no vehicle is allowed to stand.

(F) 'Even-parking' *i.e.* the date on which the vehicle is parked on the side of the road with the same number of dates each month. E.g. 2, 4, 6 .....

(B) 'Odd-parking' *i.e.* the odd numbered dates of each month for parking any vehicle. E.g. 1, 3, 5 ......

(B) 'Towing van' This means that if any vehicle is parked in no-parking, the vehicle used to carry the vehicle to the bottom of the vehicle.

(I) 'Towing van rental' *i.e.* the fare charged for transporting a vehicle parked in no-parking to the bottom of the vehicle.

(E) 'Vehicle parking fee' *i.e.* Fees for parking vehicles on public roads and in public places at different rates for different vehicles.

(F) 'Vehicle parking rent' *i.e.* the amount charged per hour for parking any vehicle.

(L) 'Vehicle type' *i.e.* the type of vehicle parked according to their size for parking rent. E.g. two wheeler, three wheeler .....

[2] Words used in this bye-law which do not include the meaning of these word groups shall be deemed to have the meaning in which they are used in the Act.

**(3) Enforcement of bylaws** :—

(1) Applicable in all areas within the limits of the Municipal Council for vehicles within the city limits and for all vehicles coming from outside the city.

(2) The work of implementing the provisions of these bye-laws in the Municipal Council which has been entrusted to the authority of the Municipal Council is as follows.

(A) Mayor / Deputy Mayor / Construction Chairman.

(B) Chief Officer

(A) Tax Inspector

(3) The above officers and office bearers shall be responsible for the implementation of even odd parking, no-parking and parking management as mentioned in Section 3 (2) of the Bye-Laws.

(4) In order to carry out this responsibility, the concerned authorities need to prescribe a planned method of even-odd parking, no-parking and parking management.

**(4) Municipal authority to prescribe even-odd parking, no-parking and parking implementation method** :—

1) The method of implementation of even-odd parking, no-parking and parking will be prescribed by the Municipal Council as per the requirement as well as according to the capacity.

(2) Even after the approval of the bye-law by the Municipal Council, considering the usefulness of parking of disciplined vehicles, the Municipal Council will be able to classify the parking of different types of vehicles and order to park the vehicles according to the type of vehicles.

**(5) Responsibility of the vehicle owner and driver after parking the vehicle on the road as well as in the parking lot** :—

(1) The method of implementation of even-odd parking, no-parking and parking will be prescribed by the Municipal Council as per the requirement as well as according to the capacity.

(2) Even after the approval of the bye-law by the Municipal Council, considering the usefulness of parking of disciplined vehicles, the Municipal Council will be able to give further classification regarding parking of different types of vehicles and order to park vehicles according to the type of vehicles in different places.

(3) After parking the vehicle in even-odd parking, the owner or the driver will be responsible for the damage or breakage of the vehicle for any reason.

(4) Only two wheelers can be parked in the even-odd parking lot.

(5) Two-wheelers parked in even-odd parking will be charged per hour.

(6) If the parked vehicle does not take possession of vehicle within the prescribed time, in case of breakage or damage to the vehicle, the entire responsibility will remain with the owner or the driver.

(7) In case of vehicle catch fire due to short circuit in the parking lot and damage of the other vehicle, the owner or driver of the vehicle will be responsible for such damage.

(8) If the vehicle park in the parking lot without receipt of vehicle parking fee receipt, No complaint of vehicle owner and driver will be taken into consideration if a complaint is made about the situation arising after parking.

**(6) Details of roads and places for even-odd parking** :–

| S. No. | Road Name |
|---|---|
| **A** | **Parking for two wheelers on the even date.** |
| 1 | Jain temple to Radhika Gift. |
| 2 | From Municipal Council Office to Late Manikrao Telange Market to Divya Darshan Corner Om Chamber. |
| 3 | Jayaram Bar to Kundalika Vaibhav Building. |
| 4 | Roha Nagothana Road Rajmata Jijau Bachat Bhavan to Romana to Nadkar's hotel. |
| 5 | Shri. Vitthal Temple to Mr. Mahesh Chachad's shop. |
| 6 | Shriram Maruti Chowk to Gangal Medical Store. |
| 7 | Andhar Ali, Rohan Apartment to Amar Complex. |

| S. No. | Road Name |
|---|---|
| **B** | **Parking on odd dates for two wheelers.** |
| 1 | Dr. Devendra Jadhav Nursing Home to Damkhadi Radhaswami Hotel. |
| 2 | From Damkhadi Radhaswami Hotel to Deshmukh Wine Shop. |
| 3 | From Rao Complex to Sachidananda Complex (Chanewala Building). |
| 4 | From the building of Nagavkar to New Express Bakery. |
| 5 | LG Complex to Tinbatti naka. |
| 6 | Roha Nagothana Road LG Complex to Hotel Pride. |
| 7 | Aadavi Bajarpeth Babulaj Jain to MJ Sales shop. |
| 8 | Shri. Vitthal Mandir Galli Shri. Kishore Doshi Hospital to Anandi Apartment. |
| 9 | From the house of Shri Pandurang Shastri Athavale to Prabhakar Pawar's House. |
| 10 | Andhar Ali, house of Mr. Nana Salvi to the house of Mr. Prakash Pawar. |

| S. No. | Road Name |
|---|---|
| **C** | **Parking for three, four wheelers.** |
| 1 | Late Dilip Ganesh Dutt Raje parking lot. |
| 2 | Bharat Ratna Dr. APJ Abdul Kalam Parking. |

**(7) Details of roads and places for no-parking :—**

| S. No. | Road Name |
|---|---|
| **A** | **No-parking zone** |
| 1 | Chowk in front of Nagar Parishad office (Excluding two wheeler parking in front of Sai Gifts to Shri. Sai collection) |
| 2 | From Nagar Parishad to Veer Savarkar Road to Ram Maruti Chowk. |
| 3 | From Borana Grocery store to Municipal Council office. |
| 4 | Late Rambhau Divekar Marg. |
| 5 | Behind ST stand bypass Road. |
| 6 | Dhanagarali Shri. Aashish Jadhav's house to Nagar Parishad. |
| 7 | Shri. Jain cloth store to Shri. Satyanarayan Temple. |
| 8 | Satya Apartment (Sagar Dairy) to Pawar House. |
| 9 | Aadavi Bajarpeth Rajamal Jain to Bodhale's House. |
| 10 | Late Janardhan Shedage store to Satyanarayan Temple. |

*Note* :– The road from Tinbatti Naka to Ram Maruti Mandir Chowk should be used for one-way traffic and parking should be done on even and odd dates. There will also be transportation from Sub-District Hospital to Ram Maruti Chowk to Veer Savarkar Road, ST Stand, Roha Kolad Main route.

**[8] Details of vehicle parking fees on the road as well as in parking lots** : —

| S. No. (1) | Place name / Vehicle bottom name (2) | Type of Vehicle (3) | Municipal rates for parking (4) |
|---|---|---|---|
| (A) | Late Dilip Ganedatta Raje | Two wheeled vehicles | For 3 hours Rs. 20 and above Rs. 30 |
| | Vehicle Base and other places owned by NP. | Three wheeled vehicles | For 3 hours Rs. 25 and Rs. 20 per hour thereafter |
| | | Four wheel small vehicles, tempo. | For 3 hours Rs. 40 and Rs. 20 per hour thereafter |
| | | Large vehicles like buses, trucks etc. | For 3 hours Rs. 50 and Rs. 20 per hour thereafter |
| (B) | Bharat Ratna Dr. A.P.J. Abdul Kalam vehicle base | Two wheeled vehicles | For 3 hours Rs. 20 and above Rs. 30 |
| | | Three wheeled vehicles | For 3 hours Rs. 25 and Rs. 20 per hour thereafter |
| | | Four wheel small vehicles, | For 3 hours Rs. 40 and Rs. 20 per hour thereafter |
| (A) | Charges to be levied on two-wheelers parked on the side of the road on an even/odd date. | | Rs. 05 Per hour |

NIDHI CHAUDHARI,
Collector, Raigad.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्थाबी/३३२०/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे.

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ ,| श्री. एन. एन. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी. | १२५ दिवस अर्जित रजा. | दिनांक ४ ऑगस्ट २०२१ ते दिनांक ६ ऑगस्ट २०२१ तीन दिवस अर्जित रजा. | दिनांक ७ ऑगस्ट २०२१ व दिनांक ८ ऑगस्ट २०२१, च्या सुट्ट्या. दिनांक ३ ऑगस्ट २०२१ चे कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ९ ऑगस्ट २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत. | श्री. एन. जी. गोसावी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी रत्नागिरी. |

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येईल. तसेच वरील प्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्थाबी २/३३६९/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा व मुख्यालय सोडणेस परवानगी मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे. त्यांना दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी ध्वजवंदनाचे कार्यक्रमासाठी नजिकच्या न्यायालयात हजर राहणेची परवानगी देणेत येत आहे.

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | श्रीमती एस. एस. मतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग १, रत्नागिरी. | ८८ दिवस अर्जित रजा. | दिनांक ९ ऑगस्ट २०२१ ते दिनांक १८ ऑगस्ट २०२१ पर्यंतची दहा दिवसांची अर्जित रजा. | दिनांक ७ ऑगस्ट २०२१ दिनांक ८ ऑगस्ट २०२१, व दिनांक १९ ऑगस्ट २०२१ च्या सुट्ट्या. दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक २० ऑगस्ट २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत. | श्रीमती आर. एस. गोसावी, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग १, रत्नागिरी यांचेकडे (२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व * |

* न्यायदंडाधिकारी वर्ग १, रत्नागिरी यांचे दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळे नंतरपासून ते दिनांक ९ ऑगस्ट २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंतचे पदभारासह).

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

संबधीत न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना दयाव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ६ ऑगस्ट २०२१.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./३८९०/२०२१.— श्री. ए. ए. शिंदे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर अलिबाग, यांची दिनांक ९ ऑगस्ट २०२१ ते १२ ऑगस्ट २०२१ अशी ०४ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक ७ ऑगस्ट २०२१ व ८ ऑगस्ट २०२१ रोजीच्या शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून दिनांक ६ ऑगस्ट २०२१ रोजीच्या का. वे. नंतर पासून ते दिनांक १३ ऑगस्ट २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. ए. ए. शिंदे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर अलिबाग येथे पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. ए. ए. शिंदे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर अलिबाग, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. ए. ए. शिंदे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. एस. डी. घनवट, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर अलिबाग यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक ९ ऑगस्ट २०२१.

---

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./३८९१/२०२१.— श्री. अ. य. थत्ते, जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग, यांची दिनांक ११ ऑगस्ट २०२१ ते दिनांक १४ ऑगस्ट २०२१ अशी एकूण ०४ दिवसांची अर्जित रजा, दिनांक १० ऑगस्ट २०२१ रोजीच्या का. वे. नंतर पासून ते दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजीच्या का. वे. पू. पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अ. य. थत्ते, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग, येथे पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अ. य. थत्ते, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. अ. य. थत्ते, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. जी. मलशेट्टी, जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड,
दिनांक ९ ऑगस्ट २०२१.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./३९११/२०२१.— श्री. एम. व्ही. तोकले, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत यांची दिनांक १० ऑगस्ट २०२१ ते दिनांक १२ ऑगस्ट २०२१ अशी एकूण ०३ दिवसांची अर्जित रजा, दिनांक ९ ऑगस्ट २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १३ ऑगस्ट २०२१ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एम. व्ही. तोकले, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत म्हणून पुर्नर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एम. व्ही. तोकले, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. एम. व्ही. तोकले, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती पी. एस. आपटे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कर्जत यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**<br>
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,<br>
रायगड-अलिबाग.

रायगड,<br>
दिनांक १० ऑगस्ट २०२१.

## पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांजकडून

### मनाई आदेश

क्रमांक कोरोना/मनाई आदेश/३७२०/२०२१.—ज्याअर्थी राज्यात कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे साथरोग कायदा, १८९७ ची अंमलबजावणी सुरू आहे. ज्याअर्थी राज्यात कोवीड-१९ साथरोगामुळे आपत्ती व्यवस्थापन कायदयाची अंमलबजावणी सुरू आहे.

(२) ज्याअर्थी राज्यात कोवीड-१९ची दुसरी लाट अटोक्यात येत आहे. परंतु अद्यापी कोविड रूग्ण आढळून येत असल्याने राज्यात कोविड प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता भासत आहे.

(३) त्याअर्थी आता साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २ नुसार प्राप्त अधिकार व आपत्ती निवारण कायदा, २००५ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून अध्यक्ष राज्य व्यवस्थापन समिती या आदेशाद्वारे उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ मधील नमुद आदेश अधिक्रमित करून संपुर्ण महाराष्ट्र राज्यासाठी निर्देश पारित केले आहेत.

(४) ज्याअर्थी **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग - १ मध्ये उप विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक ३ मधील पान क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चा क्र. एमएससी १२७४/व्हि-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ ( II १९७४) चे कलम २१ अन्वये विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करून कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

(५) त्याअर्थी, मी रुपाली अंबुरे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये नमुद सूचनांच्या अधिन राहून तसेच वरील संदर्भान्वये महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये ज्या सूचना देण्यात आलेल्या आहेत त्या सूचनांनुसार दिनांक १२ ऑगस्ट २०२१ चे शासनाचे आदेशानुसार दिनांक १५ ऑगस्ट २०२१ पासून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये पुढील आदेश होईपर्यंत खालीलप्रमाणे निर्बंध लागू राहतील :—

**(१) लोकल ट्रेन सुविधा सुरू करणेबाबत —**

लोकल ट्रेन सुविधा वापरासाठी खालील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक राहिल :—

(अ) आरोग्य सेवा देणारे अधिकारी/कर्मचारी/अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी तसेच कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा व दुसरी मात्रा ( डोस ) घेऊन १४ दिवस पुर्ण झालेल्या नागरिकांनाच लोकल ट्रेन प्रवास अनुज्ञेय करण्यात येत आहे.

(ब) ज्या कर्मचारी अथवा नागरिक यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा आणि दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण झाले आहे त्यांना लसीकरणाच्या अंतिम प्रमाणपत्राच्या आधारे लसीकरण प्रमाणपत्र व आस्थापनांच्या ओळखपत्रासह स्वतंत्रपणे राज्य शासनाने ठरवून दिलेल्या यंत्रणेमार्फत विहीत कार्यपद्धतीने (ऑनलाईन/ऑफलाईन) प्रमाणित केलेल्या ओळखपत्रधारकांनांच लोकलट्रेन प्रवासासाठी मासिक/त्रैमासिक पास देण्यात यावेत. (असे प्रमाणित ओळखपत्र प्राप्त करण्याबाबतच्या तपशिलवार व स्वयंस्पष्ट सूचना प्राधिकाऱ्यांकडून स्वतंत्रपणे प्रसारीत करण्यात येत आहेत.)

(क) रेल्वे तिकिट तपासणीस यांना लसीकरण पुर्ण झाल्याचे नमुद केलेले ओळखपत्र तपासण्याचा अधिकार असेल, ज्या प्रवाशांकडे असे ओळखपत्र नसेल किंवा प्रवाशांकडून ओळखपत्र खोटे आढळल्यास त्यांच्याकडून तसेच ज्यांनी खोटे प्रमाणपत्र प्रमाणित केले असेल त्यांचेकडून रु. ५००/ इतका दंड तसेच भारतीय दंड संहिता, १८६० नुसार कारवाई करण्यात यावी.

**(२) उपहारगृहे —**

खुली अथवा बंदिस्त उपहारगृहे आसन व्यवस्थेच्या ५० टक्के क्षमतेने खालील अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून सुरू करण्याची मुभा देण्यात येत आहे.

(अ) उपहारगृह/बारमध्ये प्रवेश करतांना, प्रतिक्षा कक्षात अथवा जेवण मिळेपर्यंतच्या कालावधीत मास्कचा वापर अनिवार्य राहील व याबाबतच्या स्पष्ट सूचना उपहारगृह आस्थापनांनी उपहारगृहात लावणे आवश्यक राहील.

(ब) उपहारगृह/बारमध्ये काम करणारे आचारी, वाढपे, व्यवस्थापक व स्वच्छता कर्मचाऱ्यांसह सर्व कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण करणे आवश्यक राहील व ज्या कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाच्या दोन मात्रा आणि दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण झाले आहे असेच कर्मचारी व व्यवस्थापक उपहारगृह/बारमध्ये काम करू शकतील तसेच या सर्व कर्मचारी व व्यवस्थापनाने उपहारगृहात मास्कचा वापर करणे अनिवार्य राहिल.

(क) वातानुकुलित उपहारगृह / बार असल्यास, वायुविजनासाठी खिडक्या असल्यास कमीत कमी दोन खिडक्या किंवा दरवाजा उघडा ठेऊन आतील हवा खेळती राहण्यासाठी पंखे लावणे आवश्यक राहील.

(ड) प्रसाधनगृहातही उच्च क्षमतेचा एक्झॉस्ट फॅन असणे आवश्यक राहील.

(इ) उपहारगृह/बारमध्ये विहीत शारिरीक अंतराचे पालन होईल यानुसारच आसन व्यवस्था करण्यात यावी.

(फ) उपहारगृह/बारमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच सॅनिटायझरची व्यवस्था असणे आवश्यक राहील.

उपरोक्तनुसार उपहारगृह/बार सुरू ठेवण्यास सर्व दिवस रात्री १०-०० वा. पर्यंत मुभा देण्यात येत आहे. उपहारगृह/बारमधील भोजनासाठी ग्राहकांकडून शेवटची मागणी जास्तीत जास्त रात्री ०९-०० वाजेपर्यंत घ्यावी. मात्र पार्सल सेवा २४ तास सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

**(३) दुकाने** —

राज्यातील सर्व व्यापारी दुकाने सर्व दिवस रात्री १०-०० वा. पर्यंत सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. दुकानात काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांचे कोविड लसीकरणाचे दोन मात्रा पुर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर १४ दिवसांचा कालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील.

**(४) शॉपिंग मॉल्स** —

राज्यातील सर्व शॉपिंग मॉल्स सर्व दिवस रात्री १०-०० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.तथापि शॉपिंग मॉलमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यवस्थापन व कर्मचारी आणि प्रवेश करणाऱ्या सर्व नागरिकांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पुर्ण व दुसरी मात्रा घेऊन १४ दिवस पुर्ण झालेले असणे आवश्यक राहील व तसे लसीकरण प्रमाणपत्र व त्यासमवेत फोटोसहित ओळखपत्र प्रवेशद्वारावर दाखविणे आवश्यक राहील.

**(५) जिम्नॅशिअम, योगसेंटर, सलुन-स्पा** —

वातानुकुलित तसेच विनावातानुकुलित जिम्नॅशिअम, योगसेंटर, सलुन-स्पा ५० टक्के क्षमतेने सर्व दिवस रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. तथापि उक्त संस्था वातानुकुलित असल्यास वायुविजनासाठी फॅन व वातानुकुलनासह खिडकी अथवा दरवाजा उघडा ठेवणे आवश्यक राहील.

**(६) इनडोअर स्पोर्टस्** —

इनडोअर स्पोर्टस् असलेल्या ठिकाणी खेळाडुंचे व तेथील कर्मचारी व व्यवस्थापन यांच्या कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या दोन मात्रा पुर्ण व दुसरी मात्रा पुर्ण व दुसरी मात्रा झाल्यानंतर १४ दिवस झालेले असणे आवश्यक राहील तसेच याठिकाणी हवा खेळती राहण्यासाठी योग्य वायुविजन व्यवस्था असणे आवश्यक राहील. याठिकाणी खेळाडूंना बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्क्वॅश, पॅरलल बार, मलखांब अशाच खेळांसाठी केवळ दोन खेळाडू या मर्यादेत सुरू करण्यावर मुभा देण्यात येत आहे.

**(७) कार्यालय/औद्यौगिक/सेवाविषयक आस्थापना** : —

(अ) सर्व शासकीय/निमशासकीय आस्थापनांचे कर्मचारी, बँक कर्मचारी, रेल्वे व म्युनिसिपल कर्मचारी व व्यवस्थापन यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण प्राथम्याने पुर्ण करण्यात यावे.

(ब) ज्या खाजगी व औद्योगिक आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांचे व व्यवस्थापनांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पुर्ण झालेले असेल त्या आस्थापनांना पुर्ण क्षमतेने सरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

(क) सर्व आस्थापनांनी गर्दी टाळण्यासाठी शक्यतो विविध सत्रात कर्मचाऱ्यांना बोलावून कामाचे व्यवस्थापन करावे ज्या आस्थापनावरील कर्मचाऱ्यांना घरून काम करणे शक्य आहे अशा सर्व आस्थापनांच्या व्यवस्थापनांनी कर्मचाऱ्यानां घरून काम करण्याची मुभा दयावी कार्यालयात काम करणे आवश्यक असल्यास कर्मचाऱ्यांच्या गर्दीच्या वेळी प्रवास टाळणे शक्य होईल अशा प्रकारे कार्यालयीन वेळेचे व्यवस्थापन करण्यात यावे.

(ड) तसेच खाजगी कार्यालयांना वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यालये २४ तास सूरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. मात्र अशा सत्र व्यवस्थापनांतर्गत कार्यालयांना एका सत्रात कार्यालयातील एकूण कर्मचारी संख्येच्या २५ टक्के उपस्थिती मर्यादित करणे आवश्यक राहील.

(८) राज्यातील सर्व मैदाने, उदयाने, चौपाटया, समुद्रकिनारे स्थानिक प्राधिकरणाने विहित केल्यानुसार त्यांच्या नियमित वेळेत सुरू राहतील.

**(९) विवाह सोहळे** : —

(अ) खुल्या प्रांगणातील/लॉन वरील किंवा बंदिस्त मंगल कार्यालयातील विवाह सोहळे संबंधित प्रांगण/लॉन/मंगल कार्यालय/हॉटेल मधील आसन व्यवस्थेच्या ५० टक्के क्षमतेने व कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे संपुर्ण पालन होईल या अटींवर मंगल कार्यालयाच्या प्रयोजनार्थ सुरू ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे.

(ब) खुल्या प्रांगण/लॉनमध्ये होणाऱ्या विवाह सोहळयास उपस्थितांची संख्या प्रांगण किंवा लॉन क्षमतेच्या ५० टक्के परंतु जास्तीत २०० व्यक्ती मर्यादित असेल.

(क) बंदिस्त मंगल कार्यालय /हॉटेलमध्ये उपस्थितांची संख्या क्षमतेच्या ५० टक्के परंतु जास्तीत जास्त १०० व्यक्ती या मर्यादित असेल.

(ड) मात्र कोणत्याही परिस्थितीत कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन केले जात आहे याची खातरजमा करण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्याला तपासणीसाठी उपलब्ध करून देणे आवश्यक राहिल या निर्बधांचे उल्लंघन करणाऱ्यावर तसेच संबंधित हॉटेल/कार्यालयावर दंडनीय कार्यवाही तसेच संबंधित हॉटेल/ मंगल कार्यालयाचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(इ) तसेच मंगल कार्यालय/हॉटेल/लॉन व्यवस्थापन/भोजन व्यवस्थापन/बँडपथक/भटजी/फोटोग्राफर्स अशा विवाह व्यवस्थेशी संबंधित सर्व संलग्न संस्था यामधील व्यवस्थापक व कर्मचारी यांचेही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण होवून दुसरी मात्रा घेतल्यानंतर १४ दिवस पुर्ण होणे अनिवार्य राहील व त्यानुसार ओळखपत्रासह प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक राहील.

**(१०) सिनेमागृहे व मल्टिप्लेक्स** : —

राज्यात सिनेमागृह / नाटयगृह, मल्टिप्लेक्स (स्वतंत्र तसेच शॉपिंग मॉलमधील) पुढील आदेशापर्यत बंद राहतील.

**(११) धार्मिक स्थळे** :—

राज्यातील सर्व धार्मिक स्थळे पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

**(१२) आंतरराज्य प्रवास** :—

ज्या नागरिकांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण झाले आहे त्या नागरिकांना बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्यासाठी आरटीपीसीआर चाचणीची आवश्यकता नसेल. अन्य प्रवाशांसाठी ७२ तास पूर्वीची आरटीपीसीआर चाचणी निगेटिव्ह किंवा १४ दिवस विलगीकरण आवश्यक राहिल.

(१३) कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यात गर्दी व्यवस्थापन करण्याबाबत केंद्र शासनाने तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे. यास्तव गर्दी/ जमाव टाळण्यासाठी वाढदिवस,राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणूक प्रचार रॅली, मोर्चे, इ. वरील निर्बंध कायम राहतील.

(१४) मेडीकल ऑक्सिजनची उपलब्धता मर्यादीत असल्याने, जर राज्यातील रूग्णसंख्या वाढल्यास व कोविड रूग्णांच्या उपचारासाठी प्रतिदिन ७०० मे. टन किंवा त्यापेक्षा जास्त ऑक्सिजन लागत असल्यास संपूर्ण राज्यात तात्काळ पूर्णपणे लॉकडाऊन घोषित करून त्यानुसार कठोर निर्बंध लागू करण्यात येतील.

(१५) राज्यातील सर्व नागरिकांना कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना जसे की, मास्कचा वापर, हातांची स्वच्छता, शारिरीक अंतराचे पालन, इतरत्र थुंकण्यास प्रतिबंध इ. सर्व निर्बंधाचे पालन करणे अनिवार्य राहिल.

(१६) सर्व दुकाने, कार्यालय, औद्योगिक आस्थापना, उपहारगृहे, बार व मॉल मालक/ व्यवस्थापनाने त्यांचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व्यवस्थापक तसेच कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पूर्ण होऊन १४ दिवस झाल्याची खातरजमा करावी व कर्मचाऱ्यांची यादी ( लसीकरण माहिती/प्रमाणपत्रासह) तयार ठेवावी व समक्ष प्राधिकाऱ्यांनी तपासणीसाठी मागणी केल्यास त्यांना उपलब्ध करून द्यावी.

(१७) दुकाने/उपहारगृहे/बार/ मॉल्सचे/कार्यालय/औद्योगिक आस्थापना यांचे नियतकालीक निर्जंतुकीकरण व सॅनीटायझेशन करण्याची जबाबदारी संबंधित मालकाची व व्यवस्थापनाची असेल. तसेच, यामध्ये कर्मचारी तसेच ग्राहकांचे तापमान घेण्यासाठी इन्फ्रारेड/कॉन्टॅक्टलेस थर्मामिटर यांची व्यवस्था करण्यात यावी तसेच यामध्ये मास्क डिस्पेंसर व बायोमेडीकल वेस्ट (वापरलेले मास्क व टिशु पेपर्स इत्यादींची विल्हेवाट) जमा करण्याची व विहित कार्यपद्धतीने विल्हेवाटीसाठी देण्याची जबाबदारी संबंधित आस्थापनांची असेल.

(१८) उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा उल्लंघन केल्यास संबंधितांविरूद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, साथरोग अधिनियम आणि भारतीय दंड संहिता, १८६० मधील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(१९) सदर आदेश दिनांक १५ ऑगस्ट २०२१ पासून अंमलात येतील.

(२०) उपरोक्त ठिकाणे/कार्यक्रम येथील संबंधीत आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो. उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२१) सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक १३ ऑगस्ट २०२१ रोजी दिलेला आहे.

**रुपाली अंबुरे,**

नवी मुंबई.

पोलीस उप आयुक्त,

विशेष शाखा, नवी मुंबई.

## विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांजकडून

### आदेश

क्रमांक विसनि/मुंबई/बँक.१५६/३५८८/२०२१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, बाजीराव शिंदे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई या आदेशान्वये समता को-ऑप., बँक मर्या., सिंग सदन, अे.एस.मार्ग, ऑफ एस.व्ही.रोड, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०५४ या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसुली करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरीता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. अजय बाबुलनाथ सिंग | व्यवस्थापक | विशेष वसुली व व विक्री अधिकारी | बृहन्मुंबई |

**अटी.—**

१. वसुली अधिकार यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम, १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दरमाहे सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

६. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

७. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " वसुली अधिकारी, समता को-ऑप., बँक मर्या., सिंग सदन, अे. एस. मार्ग, ऑफ एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०५४. " असा फलक लावता येऊ शकेल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या (Cost of Process) दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

११. वसुली अधिकाऱ्याने मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ च्या परिपत्रकातील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/ आदेश/ घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

१३. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक यांनी प्रपत्र-५ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दरमहा संबंधित संस्थेचे निबंधक यांना सादर करावा.

**बाजीराव शिंदे,**
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई.

मुंबई,
दिनांक १३ ऑगस्ट २०२१.

## OFFICE OF THE COMMISSIONER OF POLICE, BRIHAN MUMBAI

### Order

No. CP/XI (6)L.W./702 (8)/2021.— WHEREAS, considering necessity for the preservation of public peace and public safety in Brihan Mumbai. I, Chaitanya S., Dy. Commissioner of Police (Operations), Brihan Mumbai in exercise of the powers conferred upon me under sub-section (*1*) and (*2*) of section 37 read with sub-section (*6*) of section 2 and sub-section (*2*) of section 10 of the Maharashtra Police Act (Mah. XXII of 1951) do hereby prohibit the following acts throughout Brihan Mumbai for the period from 00-01 hours of 26th August 2021 to 24-00 hours on 24th September 2021.

(1) Carrying of arms, cudgels, swords, spears, bludgeons, unlicensed guns, knives, sticks or lathis or any other articles which are capable of being used for causing physical harm (violence) save for such firarms where license has been granted by this authority or where specific permission is sought to carriage of such arms from the competent authority.

(2) The carrying of any corrosive substance or explosive.

(3) The carrying, collection and preparation of stones or other missiles or instruments or means of Casting or impelling missile.

(4) The exhibition of persons or corpses or figures or effigies thereof.

(5) The public utterance of cries, singing of songs, playing of music.

(6) Delivery of harangues, use of gestures or mimetic, representations and the preparations. exhibition or dissemination of pictures, symbols, placards or any other object or thing which may in the opinion of any police officer posted in Brihan Mumbai City, offend against decency or morality on undermine the security of or tend to over-throw the state.

2. If any person goes armed with such article or carries any corrosive substance or explosive or missile in contravention of such prohibition, he/she shall be liable to be disarmed of the corrosive substance or explosive or missile and it shall be liable to be seized from him/her by any police officer and the article, corrosive substance, explosive or missile so seized shall be forfeited to the State Government ;

3. This order will not be applicable to any person being in service or employment of any Government or Government Undertaking required by his superiors or by the nature of his duties, to carry weapons. The order will also not be applicable to Private Security Guards or Gurkhas Chowkidars etc., employed on watch-n-ward duties carrying lathis admeasuring in length not exceeding 3½ feet ;

4. Notwithstanding the expiration of this order after the period hereinabove mentioned.

(a) Any investigation or legal proceedings may be instituted, continued or enforced.

(b) Any penalty, forfeiture or punishments incurred in respect of any contravention of this order may be imposed, as if this order had not expired.

5. I further direct that this order shall be published and promulgated in Brihanmumbai by affixing copies thereof in conspicuous public places and by announcing the same through loudspeakers or megaphones, as well as publishing through media of whatever form available.

Given under my hand and Seal on this 23rd day August, 2021 at Mumbai.

CHAITANYA S.,
Deputy Commissioner of Police (Operations)
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

Mumbai.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक जिऊनि/मुंबई १/कक्ष ३/कलम १५६/आदेश/१२७४/२०२१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, श्री. जे. डी. पाटील, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर या आदेशान्वये कामगार एकता नागरी सहकारी पतपेढी मर्यादित., ६/६१, म्युनिसिपल लेबर कॅम्प, नायगांव क्रॉस रोड, नायगांव, दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४, या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली प्रमाणपत्राची, कलम ९१ अन्वये मा. सहकार न्यायालयाकडील प्राप्त हुकुमनाम्याची तसेच कलम ९८ अन्वये प्राप्त प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार व मालमत्तेची वाजवी किंमत निश्चितीचे अधिकार तसेच मालमत्ता विक्री कायम करण्याचे अधिकार वगळून खालील अटीस अधिन आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. विनोद धाकु गुडेकर | व्यवस्थापक | विशेष वसुली व विक्री अधिकारी | बृहन्मुंबई |

**अटी.—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दर माह सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रपत्र १,२,३,४ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित उप निबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्यांचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ६ एप्रिल २०१८ चे आदेशान्वये वसुली अधिकारी यांनी वसूल करावयाच्या हुकुमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) निश्चित केला असून त्यानुसार वसुलीच्या टप्प्यावर आदेशिकेचा खर्च संबंधित थकबाकीदारांकडून वसूल करावा. तसेच आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेवून वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

७. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तत्काळ काढून घेण्यात येतील. तसेच वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

८. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

९. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही महाराष्ट्र शासन नियुक्त आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दाचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७) " असे लिहावे.

१०. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " वसुली अधिकारी कामगार एकता नागरी सहकारी पतपेढी मर्यादित., ६/६१, म्युनिसिपल लेबर कॅम्प, नायगांव कॉस रोड, नायगांव, दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४ " असा फलक लावता येवू शकेल.

११. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देवून परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१२. वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक १ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१३. कलम १०१ खालील वसुली दाखल्याप्रमाणे कर्जाची वसुली करताना प्रथम कर्जदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता, तद्नंतर प्रथम जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता व त्यानंतर पुढील जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता या क्रमाने कर्जवसुलीचे प्रक्रीया राबवावी.

**जे. डी. पाटील,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई (१) शहर.

मुंबई,
दिनांक १५ जुलै २०२१.

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ सप्टेंबर २०२१

### सूचना

क्रमांक टीपीएस-१२१९/१२४४/प्र.क्र.१३/२०/नवि-१२.— ज्याअर्थी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना " असा केलेला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम १५(१) मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१५८५/२३०५/ प्र.क्र.२२६/८७/नवि-१, दिनांक २३ डिसेंबर १९८७ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १५ फेब्रुवारी १९८८ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी , उक्त प्रादेशिक योजना अंतर्गत मौजे कुडाळ व इतर गावांकरिताच्या क्षेत्रासाठीचा कुडाळ झोन प्लॅन (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त झोन प्लॅन " असा करण्यात आला आहे.) महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ मधील नियम ४ अन्वये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २७ मे १९९७ रोजी मंजूर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील पर्यटन क्षमता विचारात घेऊन शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१९९७/ ३५५/प्र.क्र.९९/नवि-१२, दिनांक १५ ऑक्टोबर २००४ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) अन्वये उक्त प्रादेशिक योजनेत फेरबदल केला आहे आणि अतिरिक्त विकास नियंत्रण नियमावली अंतर्भूत करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त झोन प्लॅनमधील जमीन वापर प्रस्तावानुसार मौजे माणकादेवी, ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग येथील सर्व्हे क्र. ३६ (जुना सर्व्हे क्र. ४९५), हिस्सा नं. ५७ब ही जमिन (या पुढे जीचा उल्लेख " उक्त जमीन " असा केलेला आहे.) भागशः औद्योगिक व भागशः फळबाग विभागामध्ये समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन औद्योगिक व फळबाग या वापर विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेची विनंती संबंधित जमीन मालकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडे दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त जमीन उक्त अधिनियमाच्या कलम २०(२) मधील तरतुदीनुसार फळबाग व औद्योगिक या वापर विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त फेरबदल " असा करण्यात आला आहे.) ;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम ३ नुसार शासन उक्त झोन प्लॅन क्षेत्रामधील मौजे माणकादेवी, ता.कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथील सर्व्हे क्र. ३६ (जुना सर्व्हे क्र. ४९५), हिस्सा नं. ५७ब या जमिनीचे उक्त फेरबदलाकरिता, शासनाच्या दिनांक ६ मे २०१५ रोजीच्या शासन निदेशानुसार जमीन वापर बदलाकरिताचे प्रक्रिया शुल्क व सूचना प्रसिद्धीकरणाचे शुल्क तसेच दिनांक ४ जानेवारी २०१६ रोजीच्या निदेशानूसार अधिमुल्य संबंधित जमीन मालकांना आकारणी सापेक्ष फळबाग व औद्योगिक वापर विभागामधून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलासंदर्भात आम नागरिकांकडून सदरची सुचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १(एक) महिन्याचे कालावधीत हरकती आणि/किंवा सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. तसेच सदर प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने हरकती आणि/किंवा सूचना सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, रुम नं. ३०५, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दाखल कराव्यात. सह संचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना प्रस्तावित फेरबदलावर विहित मुदतीत प्राप्त होणा-या हरकतीं आणि/किंवा सूचनांवर संबंधितांना सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी तसेच नियोजन प्राधिकरण यांचे म्हणणे विचारात घेऊन शासनास अहवाल सादर करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. सदरची सूचना व उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयांमध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

(१) सह संचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, तिसरा मजला, कक्ष ३०५, नवी मुंबई.
(२) जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
(३) सहायक संचालक, नगर रचना, सिंधुदुर्ग शाखा, जि. सिंधुदूर्ग.

सदरची सूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd September 2021

*NOTICE*

No. TPS-1219/1244/C.R.-13/20/UD-12.— Whereas, the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1585/2305/C.R. 226/87/UD-1, dated 23rd December 1987 (hereinafter referred to as " the said Notification") has Sanctioned the Regional Plan for Ratnagiri – Sindhudurg Region (hereinafter referred to as " the said Regional Plan") as per provision Section 15(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act "), which has come into force with effect from 15th February 1988 ;

And whereas, the Collector, Sindhudurg has Sanctioned the Kudal Zone Plan (hereinafter referred to as " the said Zone Plan") comprising for Village-Kudal and other villages from the said Regional plan as per provisions of section 4 of Maharashtra Land Revenue Rules , 1969 (Conversion of Use of Land and Non- Agriculture Assesement) dated 27th May 1997 ;

And whereas, by considering the Torisum potential of Sindhudurg District, the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1997/355/C.R.-99/UD-12, dated 15th October 2004 has Sanctioned the Modification in the said Regional Plan under Section 20(4) of the said Act and additional Development Control Regulations are added into it ;

And whereas, as per land use proposal of the said Zone Plan, the land bearing Survey No. 36 ( Old Survey No. 495), Hissa No. 57B of Village- Manakadevi, Taluka- Kudal, Dist. Sindhudurg (hereinafter referred to as " the said Land") is included in partly Industrial Zone and partly Orchards Zone ;

And whereas, the land owners has requested to Collector, Sindhudurg to delete the said Land from Industrial Zone and Orchards Zone and to included the same in Residential Zone *vide* lette dated 20th September 2017 ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director Of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government feels it necessary that the said lands should be deleted from Industrial Zone and Orchards Zone into Residential Zone as per provisions of section 20(2) of the said act (hereinafter referred to as " the said Modification") ;

Now therefore, in accordance with the provisions contained in sub-section (*3*) of section 20 of the said Act, the Government hereby publishes this notice, for inviting suggestion and/or objections in respect of the proposed modification, from the general public within 1 (One) month from the date of the publication of the notice in the *Official Gazette*. The suggestion and/or objections shall be addressed to the Joint Director of Town Planning, Konkan Division, 3rd floor, Main Building, Room No. 305, Konkan Bhavan, Navi Mumbai who is hereby authorized to hear the suggestion and/or objections which may be received within the aforesaid prescribed period and to submit his report to the Government. The objections/suggestions received within the aforesaid stipulated period shall only be considered by the Government.

The proposed modification and plan appended to this notice shall be available for inspection by general public during working hours on all working days for the period of one month in the following offices :-

(1) Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, 3rd floor, Room No. 305, Belapur, Navi Mumbai.

(2) The Collector Sindhudurg, Dist. Sindhudurg.

(3) Assistant Director of Town Planning, Sindhudurg Branch, Dist. Sindhudurg.

This notice is also made available on the Government Website : *www.maharashtra.gov.in* (Acts and Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.